Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - I January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २६ | रयतेचा राजा छत्रपती शाहू महाराज<br>**प्रा. डॉ. सौ. सुषमा विश्वरत्न तायडे**<br>**प्रा. डॉ. के. के. अहिरे** | ९९-१०२ |
| २७ | राजर्षी शाहू यांचा स्त्री शिक्षण विषयकय दृष्टीकोन<br>**प्रा. कल्पना व्ही. पाटील** | १०३-१०६ |
| २८ | छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक क्रांतीविषयी विचार<br>**प्रा. कांतिलाल दाजभाऊ सोनवणे** | १०७-११० |
| २९ | राजर्षी छत्रपती शाहू यांचे शिक्षणविषयक कार्य - एक अभ्यास<br>**प्रा. किशोर शिवलाल पाटील** | १११-११४ |
| ३० | आधुनिक महाराष्ट्राच्या जडण-घडणीत राजर्षी शाहू महाराजांचे स्थान<br>**प्रा. कोल्हे तुकाराम त्रिबंक** | ११५-११९ |
| ३१ | राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक : ध्येय व धोरण<br>**प्रा. लक्ष्मण बैसाने** | १२०-१२२ |
| ३२ | राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक कार्याचा भौगोलिक दृष्टीने अभ्यास<br>**प्रा. एम. एल. सावंत** | १२३-१२८ |
| ३३ | राजश्री शाहू महाराजाच्या सामाजिक कार्य आणि विचाराचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. महेंद्र व्ही. पाटील** | १२९-१३३ |
| ३४ | राजर्षी छत्रपती शाहु यांची ऐतिहासिक कामगिरी<br>**प्रा. मनिष रघुनाथ करंजे**<br>**प्रा. डॉ. सुनिल सी. अमृतकर** | १३४-१३६ |
| ३५ | राजर्षी शाहू महाराज यांची जलनीती : एक तात्वीक चिंतन<br>**प्रा. डॉ. नरवाडे बालाजी मारोतराव** | १३७-१४० |
| ३६ | क्रांतीकारी युगप्रवर्तक छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील ऐतिहासिक संबंध<br>**डॉ. पंकजकुमार शंकर प्रेमसागर** | १४१-१४७ |
| ३७ | राजश्री शाहू महाराजांचे शिक्षण विषयक धोरण<br>**प्रा. डॉ. पाटील संजू भटा** | १४८-१५२ |




CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# ३७. राजश्री शाहू महाराजांचे शिक्षण विषयक धोरण

**प्रा. डॉ. पाटील संजू भटा**
भुगोल विभाग प्रमुख, विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, जि. नंदूरबार.

**प्रस्तावना**

राजश्री शाहू महाराज यांनी आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांचा सर्वांगिण क्षेत्रातील प्रगती घडवुन आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजश्री शाहू महाराज होय. कवी सुर्यकांत पांडेकर यांनी आपल्या कवितेतुन व्यक्त करतांना असे म्हटले आहे की हिरे, माणके, सोने, उधळा जयजयकार करा! राजश्री शाहू महाराज तुजला! हा मुजरा या भावना म्हणजे छत्रपती शाहु महाराजांमध्ये ज्यांच्या आयुष्याच अक्षरशः सोन झाल अशा प्रत्येक जनसामान्यांच्या भावना होत. ब्रिटीशांच्या अंमलाखालील संस्थानांचा मर्यादित अधिकार असलेला राजा. महात्मा ज्योतिबा फुलेंचा दलितोद्धाराचा वारसा पुढे चालवणारा कर्तबगार समाज सुधारक महाराष्ट्राला अभिमान असलेला छत्रपतीचे वारस असे अनेक पैलु असलेले शाहू महाराजांचे चरित्र वर्णन करणे हे विचारवंतासाठीही एक आव्हानच आहे. जिवंतपणी विरोध आणि मृत्युनंतर देवत्व ही परंपरा महाराष्ट्राने संत ज्ञानेश्वराच्या काळापासून जोपासली आहे. त्याचप्रमाणे लोकांचा राजा म्हणून लोकमान्यता पावलेले राजश्री शाहू महाराज होय.

**छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य**

छत्रपती शाहू महाराजांच्या एकूण कार्यात त्यांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्वाचे आहे. महात्मा फुले यांच्या प्रमाणेच सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. शाहू महाराजांनी अधिकारग्रहण केले त्यावेळी बहुजन समाजात मॅट्रिक उत्तीर्ण झालेल्यांची संख्या अल्प होती. खेड्यांमध्ये प्राथमिक शाळा नव्हत्या. सर्वसामान्य बहुजन समाज अज्ञानाचे व अंधश्रद्धेचे जीवन जगत होता. शिक्षण घेणे हे ब्राम्हण किंवा श्रीमंत सावकारांचे काम आहे. आपले काम नाही अशी या समाजाची समजूत होती. ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राम्हण जातीची मक्तेदारी ब्रिटिशपूर्व काळापासून निर्माण झालेली होती. इंग्रजांनी विद्येचे प्रवेशद्वारे सर्व जातींसाठी खुली केली; तथापि, पूर्वीपासून ज्यांना विद्याभ्यासाची परंपरा नव्हती त्यांना या नव्या संधीचा लाभ घेता आला नाही. बहुजन समाजातील असंख्य लोक अज्ञान व दारिद्र्याचे जीवन जगत होते. छत्रपती शाहू महाराजांनी या अज्ञानी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निश्चय केला. बहुजन समाजाला, स्त्रियांना सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सोय उपलब्ध करण्याचे धोरण त्यांनी आखले. बहुजन समाजाची शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करण्याचे त्यांनी ठरविले. "शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे. असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही

निपजणार नाहीत, म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे" अशी छत्रपती शाहू महाराजांची विचारसरणी होती.

**प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य**

बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी महाराजांनी योजनाबद्ध आखणी केलेली दिसते. प्राथमिक शिक्षणाचा पाया दृढ केल्यानंतर उच्च शिक्षणापर्यंत वाटचाल करण्याचा त्यांना निश्चय होता. या बाबतीत ते म्हणतात, "प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे. तरी माध्यमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जोराने खटपट चालली आहे. यावरून शक्य तितक्या लवकर माझ्या रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे हे आपल्या ध्यानी येईलच. माझी प्रजा मराठी तिसरी इयत्ता जरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांती घेतली असती. तथापि, अधिकार दान करण्यापूर्वी सर्व लोकांमध्ये विद्याप्रसार करण्याकडे अगोदर लक्ष देणे जरुर आहे." प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराद्वारे भरभक्कम पायावर उच्च शिक्षणाची इमारत उभी करण्याचा त्यांचा मानस होता. सन १९१३ मध्ये शाहू महाराजांनी प्रत्येक गावात निदान एक तरी शाळा असावी व ती शाळा गावात बहुसंख्येने राहणाऱ्या जातीच्या व्यक्तीने चालवावी असे त्यांचे मत होते. शिक्षकांचा गावकामगारांत समावेश करून वतनाने भाडेमुक्त जमीन देण्याचे त्यांनी ठरविले. शिक्षणाविषयी शिक्षकांच्या मनात आस्था निर्माण व्हावी व त्याने शिक्षण विषयक चळवळीला गती यावी असे महाराजांना वाटप होते. तथापि शिक्षकांच्या बाबतीत वतनदारी पद्धत उपयुक्त न ठरल्याने त्यांनी शिक्षकांची पगारावर नेमणूक सुरु केली. सन १९१३ च्या आदेशानुसार निरनिराळ्या खेड्यांमध्ये मंदिरे, चावडी, धर्मशाळा या इमारतींमधून प्राथमिक शाळा सुरु झाल्या. शाळेच्या इमारतीचे बांधकाम, दुरुस्ती व देखरेख ही कामे पाटील, कुलकर्णी व प्रजाजनांवर सोपविली. शिक्षणाच्या कार्यात समाजाचा सहभाग मिळविण्याची त्यांनी योजना केलेली दिसते. बहुजन समाजाच्या सर्वांगिण हितासाठी प्राथमिक शिक्षणाच्या द्वारे छत्रपती शाहू महाराज व्यापक बैठक तयार करीत होते. त्या दृष्टीकोनातूनच त्यांनी निरनिराळ्या शिक्षणसंस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले. त्यामुळेच कोल्हापुर संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला.

**सक्तीचे शिक्षण**

बहुजन समाजाचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता. लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सर्वजण या शेतीत गुंतले जात. शिवाय अज्ञानामुळे बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्व समजलेच नव्हते. म्हणूनच महाराजांनी सक्तीच्या शिक्षणाचे धोरण आखले. त्या अगोदर पाचशे ते एक हजार लोकवस्तीच्या गावी कोठे शाळा सुरु करता येईल? कोणत्या सार्वजनिक इमारतीचा उपयोग करता येईल? याची माहिती त्यांनी संकलित केली. या गावांमधून ताबडतोब शाळा सुरु करण्याचे आदेश दिले. देवस्थानाच्या उत्पन्नातुन नित्यनैमित्तिक खर्च वजा जाता उरलेले उत्पन्न शाळेला द्यावे असे ठरविले. २५ जुलै १९१७ च्या हुकुमानुसार महाराजांनी प्राथमिक शाळेत फी माफीची घोषणा केली. २१ नोव्हेंबर १९१७ रोजी काढलेल्या जाहिरनाम्यानुसार कोल्हापुर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. खेड्यातुन या सक्तीच्या शिक्षण योजनेचा अंमल सुरु झाला. शिक्षणासाठी योग्य वय असलेल्या मुलामुलींना शाळेत पाठविण्याबद्दल पालक व गाव कामगार यांच्यावर कडक बंधने लागु केली. या सक्तीच्या व मोफत शिक्षण योजनेमुळे



CamScanner

शिक्षणाच्या प्रसाराला विस्तृत स्वरुप प्राप्त झाले. या धोरणाचा इतका फायदा झाला की १९१७-१८ साली शाळांची संख्या २७ व विद्यार्थ्यांची संख्या १,२९६ होती. ती १९२१-२२ मध्ये ४२० शाळा व २२,००७ विद्यार्थी इतकी वाढलेली दिसते. छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रातील या योजनांचा स्विकार करताना त्यावर सर्वकष विचार केलेला होता. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीच्या योजनेत शाळांची निर्मिती, देखभाल, उत्पन्न, खर्च, शिक्षकांची नेमणूक आदी व्यवस्थेच्या बाबतीत त्यांनी स्पष्ट नियम घालून दिलेले होते. प्राथमिक शाळांच्या वाढत्या संख्येवरही बराच शिक्षकही वाढणार याची जाणीव ठेवून जून १९१८ पासून शिक्षकांची परीक्षा घेण्यास त्यांनी सुरुवात केली. यासाठी शिक्षकी पेशास आवश्यक असलेला चांगला वर्तणुकीचा दाखला व पंचवीसच्या आतील वय ही अट घातली. परीक्षेत पास होऊन वर येणाऱ्याला अनुक्रमाने शिक्षक म्हणून घेतले जाईल असे त्यांनी ठरविले. केवळ गुणवत्तेवर आधारलेली ही यथार्थ पद्धत होती. या योजनेचा प्रचंड खर्च चालविण्यासाठी १९१८ मध्ये शिक्षण विषयक कराचा कायदा केला. दरमहा शंभर रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या व्यक्तींवर हा शिक्षण कर वसूल करण्यास सुरुवात केली. शिक्षणावर शासनाच्या होणाऱ्या अमाप खर्चावरून महाराजांची प्रखर ध्येयनिष्ठा दिसते. सन १९१९ मध्ये त्यांनी अस्पृश्यांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळा बंद पाडल्या व अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळेतुन इतर जातीच्या मुलांप्रमाणेच दाखल करून घ्यावे असे धोरण जाहीर केले.

छत्रपती शाहू महाराजांचा केवळ शिक्षण देणे, सोयी करणे किंवा शिक्षणविस्तार करणे एवढा मर्यादितच हेतू या प्रयत्नामागे नव्हता, तर जनसामान्यांच्या मनात शिक्षणासंबंधीची अभुतपुर्व लालसा रुजविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. उच्च शिक्षणात नादारी देतानाही प्रथम शेती व मोलमजुरी करणाऱ्या जातीच्या मुलांना, अस्पृश्य जातीतील मुलांना नादारी द्यावी असे त्यांचे धोरण होते. बहुजन समाजाला पत, प्रतिष्ठा व स्वतंत्र सामाजिक दर्जा मिळवुन देण्याचा महाराजांनी प्रयत्न केला असे दिसते.

**स्त्री शिक्षण**

बहुजन समाजाप्रमाणेच स्त्री जीवनाच्या मागासलेपणाची शाहू महाराजांना जाणीव होती. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत महाराजांनी जाहीर केलेली होती. आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर त्यांना शिक्षण देऊन कोल्हापुर संस्थानचे शिक्षण खाते त्यांच्याकडे सोपविण्याचा महाराजांचा विचार होता. तथापि राणीसाहेबांच्या मृत्यूमुळे तो पूर्ण झाला नाही. संस्थानच्या शिक्षणाधिकारी म्हणून मिस लिट्लनंतर त्यांनी श्रीमंत रखमाबाई केळवकर यांची नेमणूक केली. यावरून महाराजांचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टीकोण स्पष्ट होतो. स्त्री शिक्षणामुळे कुटुंबाचा, समाजाचा अप्रत्यक्षपणे विकास घडून येतो. स्त्रीला कुटुंबात व समाजात आदराचे व मानाचे स्थान मिळणे शक्य होते. असा महाराजांचा विश्वास होता.

**उच्च व व्यवसाय शिक्षण**

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच छत्रपती शाहू महाराजांनी माध्यमिक व उच्च शिक्षणालाही महत्व दिले. सन १८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरु झालेल्या एका इंग्रजी शाळेचे सन १८८१ साली राजाराम महाविद्यालयात रुपांतर झाले. जहागिरदार व सरदारांकडून मिळणाऱ्या वर्षासनातून या महाविद्यालयाचा खर्च चाले. वर्षासने बंद झाल्यानंतर



CamScanner

दरबारातर्फे या महाविद्यालयाला दरवर्षी ५०,००० रुपये देण्यास सुरुवात झाली. या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींची संख्या वाढत होती. पुढील काळात आर्य समाजाचे धोरण सामाजिक सुधारणेला अनुकूल असल्यामुळे ते या महाविद्यालयाची व्यवस्थित प्रगती करतील या विश्वासाने छत्रपतींनी हे महाविद्यालय आर्य समाजाकडे सोपविले. आर्य समाजाच्या नियंत्रणाखाली या महाविद्यालयाची प्रगती झाली.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाप्रमाणेच शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणालाही महत्व दिले. ग्रामाचा कारभार व्यवस्थित चालविला जाण्यासाठी महाराजांनी "पाटील स्कुल व तलाठी स्कुल" सुरु केले. या शाळांमधून पाटील व तलाठ्यांना सर्वसाधारण जमाखर्च, कायदे, शांतता व सुव्यवस्था, महसूल विषयक दक्षता इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात असे. शैक्षणिक प्रगतीत शिक्षक हा महत्वाचा घटक असल्याने या शिक्षकांसाठी 'प्रशिक्षण केंद्र' सुरु केले. सहा महिन्यांच्या प्रशिक्षण काळात वीस शिक्षकांना अंकगणित, भाषा, शालेय व्यवस्था, अध्यापन पद्धती इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात होते. तांत्रिक शिक्षणाची समाजात आवड निर्माण व्हावी म्हणून "जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूटची" स्थापना केली. या संस्थेत विद्यार्थ्यांना लोहारकाम, गवंडीकाम, सुतारकाम यांसारख्या विषयांचे शिक्षण दिले जाई. विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षणाची आवड निर्माण केली. या विविध शिक्षण संस्थांच्याद्वारे बहुजन समाजाला विविधांगी शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे श्रेय छत्रपती शाहू महाराज यांनाच द्यावे लागते.

**विद्यार्थी वसतिगृहाची निर्मिती**

माध्यमिक, तांत्रिक किंवा उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध असूनही खेड्यापाड्यातील अनेक विद्यार्थ्यांना या संधीचा फायदा घेता येत नाही. हे महाराजांना जाणवले. शहरात त्यांच्या राहण्या व जेवण्याची सोय होत नाही. शिवाय गरीबी व काही वेळा त्याची जात या गोष्टीमुळे अडचणी निर्माण होतात हे त्यांच्या लक्षात आले. ही समस्या दूर करण्यासाठी कोल्हापुरात विद्यार्थी वसतीगृहांची निर्मिती करण्याचे धोरण त्यांनी आखले. सन १८९६ मध्ये कोल्हापुरात सर्व जातीजमातींच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी एक वसतिगृह सुरु केले. विद्यार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची तेथे मोफत सोय केली. तथापि या वसतिगृहात तीन वर्षाच्या काळात केवळ ब्राम्हण विद्यार्थ्यांनाच समाविष्ट केले गेले हे लक्षात आल्यानंतर शाहू महाराजांनी कोल्हापुरात निरनिराळ्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे काढण्याचा निर्णय घेतला. थोड्याच काळात कोल्हापूरमध्ये व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, दिगंबर जैन बोर्डिंग, श्री नामदेव बोर्डिंग, सुतार बोर्डिंग, नाभिक विद्यार्थी वसतिगृह, रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग इत्यादी निरनिराळ्या जातींची सुमारे वीस वसतिगृहे निर्माण झाली. या वसतिगृहांमधुन विद्यार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था केली जात असे.

**निष्कर्ष**

शुद्ध मराठी व फर्डे इंग्रजी बोलणारे महाराज दैनंदिन कामकाज मात्र खास जनतेची रांगडी भाषाच बोलत मुठभर समाजालाच संपुर्ण ज्ञान मिळण्यापेक्षा संपुर्ण समाजाला मुळ ज्ञान मिळावे ही त्यांची विचारधारा कोल्हापुरचा शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवुन गेली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा धाडसी निर्णय घेणारा शिक्षण घेतांना व समाजात वावरतांना जात आडवी येवू नये म्हणून अस्पृश्यता निवारणाचा कायदा सर्वप्रथम करणारा, शिक्षण

घेणाऱ्या दलितांना नोकरीत पन्नास टक्के आरक्षण ठेवणारा, विद्यार्थ्यांसाठी अनेक वसतीगृहे काढणारा हा राजा शिक्षणविषयक आपली भुमिका स्पष्ट करतांना म्हणतो की, लोकांना राज्य करण्याचा अधिकार प्राप्त होण्याआधी राज्य करण्यासाठी पात्रता आधी त्यांच्या अंगी आली पाहिजे. लोकांना अधिकाराची माहिती होण्याआधी जबाबदारीचे ज्ञान प्राप्त होणे गरजेचे आहे. समाज सुशिक्षित करणे व लोकांनी मने तयार करणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. त्यांच्या या विचारसरणीमुळे महात्मा ज्योतिबा फुलेंच्या विचारांनाच जणू वारस मिळाला.

**संदर्भ ग्रंथ**

१) किर धनंजय - राजश्री शाहू महाराज, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती २००५.
२) पवार जयसिंगराव - राजश्री शाहू महाराज स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र माहिती प्रबोधिनी, कोल्हापुर, द्वितीय आवृत्ती २००७.
३) भिडे जी.एल., पाटील एन.डी. - महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापुर, चौथी आवृत्ती १९९४.
४) कनिटकर रा.प्र. - एकशे एक श्रेष्ठ मानव, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती १९९८.
५) यांनी घडवल सहस्त्रेक - संकलन - आनंद अवधानी, रोहन प्रकाशन, पुणे, नववी आवृत्ती २००६.
६) देशमुख मा.म. - राष्ट्रनिर्माते, शिवभारती प्रकाशन, नागपुर, पहिली आवृत्ती १९९२.
७) प्रधान ग्रं.प. - स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत, पुणे १९८७.
८) Hans Raj - History of modern India, Kolhapur, १९८७.
९) Tarachand - History of Freedom movement, New Delhi, १९७२.
१०) Suda J.R. - Indian National Movement.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
English Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com




Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I English Part - IV January - March - 2019

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal
Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

CS CamScanner

# CONTENTS OF ENGLISH PART - IV


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 12 | Wheat Productivity: A Case Study of Solapur District<br>**Dr. P. B. Gone**<br>**Dr. I. M. Hashmi** | 81-87 |
| 13 | Impact of Training and Development in Tribal Areas of Madhyapradesh<br>**Dr. Rashmi Singh** | 88-94 |
| 14 | Price Trend Analysis of Yellow Gram Commodity in Taloda APMC, a Tribal Region of Nandurbar District (M.S.)<br>**Dr. S. B. Patil** | 95-103 |
| 15 | Geographical Study of Dwarkadhish Sugar Industries in the Nashik District<br>**Mr. A. C. Gaikwad**<br>**Dr. S. N. Nikam** | 104-112 |
| 16 | A Geographical Study Rice Productivity in Solapur District<br>**Prin. Dr. S. H. Gone**<br>**Dr. R. S. Dhanushwar** | 113-119 |
| 17 | Spatial Disparities in the Levels of Development in Jalgaon District<br>**Mr. D. S. Nikumbh**<br>**Mr. S. R. Adgale** | 120-125 |
| 18 | Geographical Analysis of Sex Ratio in Sakri Tahsil of Dhule District, Maharashtra<br>**Dr. Prakash K. Patil**<br>**Smt. Punam B. Deore**<br>**Mr. Jayesh N. Kor** | 126-140 |
| 19 | Analysis of Cropping Pattern in Sakri Tahsil of Dhule District, Maharashtra<br>**Dr. Manisha S. Pawar**<br>**Mrs. Priyanka D. Nikumbh**<br>**Dr. Prakash K. Patil** | 141-153 |
| 20 | The Geographical Study of Socio- Economic Changes of Population in Nandurbar District<br>**F. M. Rathod**<br>**Dr. L. P. Sandanshiv**<br>**Dr. S. K. Shelar** | 154-160 |




CamScanner

# 14. Price Trend Analysis of Yellow Gram Commodity in Taloda APMC, a Tribal Region of Nandurbar District (M.S.)

**Dr. S. B. Patil**
Arts & Commerce College, Akkalkua, Dist Nandurbar.

**Abstract**

Taloda is a small tribal tehsil located near the foot of Satpuda Mountain in Nandurbar district of Maharashtra state (India). In the study region agriculture is only one occupation in the vicinity of forest. State Government has protected the forest zone; hence tribal people could not get economic support from the forest. On other hand agriculture is a gamble game depends upon uncertain monsoon rainfall. When farmers produce agriculture commodities they could not get the production cost also. Farmers ought to face with several problems such as high fluctuating prices, unavailability of facilities and amenities in market campus, money problem, high labour cost, disbars of lone installments etc. Out of them researcher has attempted one link of problems related to actual exploitation of farmers in the APMC Taloda. In this research paper an attempt is made to display how the merchants exploit the farmers by paying lowest prices.

**Keyword:** APMC, Price, Variation, Arrival, Exploitation, Agro-economic, Trends, Fluctuation, Change, Deviation, Range, Coefficient, Variation, Yellow Gram.

## Introduction


The study region produces number of crops such as Cotton, Soyabean, Jawar Wheat, Yellow Gram, Green Gram, Rice and Corn etc. Though well fertile land, favorable climate, good quality soil, etc are favorable, however the economic background of the farmers is weakened there. There are number of adverse factors creating hurdles on the way of tribal farmers. Out of these factors, agro-market system is one of them. Generally in the market, farmers do not get justice; the commercial agents exploit them. When they produce Yellow Gram commodity they get lowest prices and when prices are hiked up they have already sold their products. On other hand most of tribal farmers are illiterate. They are located in remote areas, where inaccessibility is hindering the economy of the farmers. Considering all these issues, researcher is attracted towards the detail study of selling and purchasing system in the market federation board at



CamScanner

Taloda which is a tribal tehsil in Nandurbar district. It comprises 93 villages with 128531 populations (9.80% of the district). Out of the total population of the tehsil about 72.29% population belongs to schedule tribes (92918 populations) and 2.35% population belongs to schedule cast.

**Study Region**




The study region has covered 347.0266 sq km, stretching between $21^0$ 32'North to $21^0$ 42' North latitudes and $74^0$ 01'East to $74^0$ 22'East longitudes. Satpura mountain ranges have occupied the northern 30% area of the tehsil. Satpuda mountain is clothed with reserved forest (7776.84 ha) and dotted by tribal settlements. Geographically the study region is unique in respect of morphology, hills, steep slope; v shaped valleys and exposed rocks. Piedmont plain has covered about 70% of the tehsil, favorable for irrigated and unirrigated crops. Wheat, cotton, jawar, corn, yellow gram, green gram etc are significant crops successfully grown by the tribal farmers. To protect and to provide better facilities to farmers, government has established APMC on November 1961 at Taloda in Nandurbar district. Tribal farmers are far away from the urban

culture. Their basic needs are limited, however they are economically poor. To understand the causes of poorness, researcher has selected to study the agro-economic process in Taloda APMC.

**Research Methodology**

**A) Data Base:** Secondary data of daily arrival and prices of Yellow Gram commodity have been collected personally from APMC Taloda cited as below.

**B) Secondary Source of Data**

1. Daily arrival of Yellow Gram commodity in the market during the year 2010-11.
2. Quantity and price of Yellow Gram purchased by the merchants in APMC Taloda.
3. Name of merchants and commission agents those have purchased Yellow Gram in Taloda APMC.
4. Village wise number of farmers those have sent their produce in APMC.

In the present work researcher has attempted to analysis price fluctuations on the basis of trend analysis of monthly price data. With the help of following statistical techniques researcher has attempted to display seasonal and monthly fluctuations in the prices of Yellow Gram. Data Collected from APMC and Census handbook is systematically analyzed with the help of Excel worksheet and various Tables and graphs are prepared to display supply and price trend of Yellow Gram commodity.

1. **Graphical Presentation of Price Fluctuation:** Line and bar graphs are one of the best techniques, at a glance display variations and trend in price fluctuations.
2. **Statistical Analysis:** For Price Trend Analysis following techniques are used:

1. **Range of Fluctuations:** A price change in a given month relative to price of previous month represents a measure of range of fluctuations, calculated using following equation.

$$= \text{Per Quantal maximum price} - \text{Per Quantal actual price}$$

2. **Co-Efficient of Variations:** Co-efficient of variation denotes Cv, eliminates the unit of measurement from the standard deviation of a series of number by dividing it by the mean of this series of numbers. Cv is expressed in percentage which corresponds to following formula.

$$Cv = \frac{S}{M} * 100$$

S = Standard deviation of series.

M = Mean of series.

3. **Change in the Prices:** Proportion of change in current month price and previous month price is calculated as below:

$$\% \text{ change in the prices} = \frac{\text{Curent month price}}{\text{Previous month price}} * 100 - 100$$

4. **4. Three monthly Moving Average of Price:** Moving averages are used to identify current trends and trend reversals as well as to set up support and resistance levels. Graphical chart pattern shows a lot of variation in price movement. This can make it difficult for traders to get an idea of a security's over all trends. One simple method traders use to compact this is to apply moving average. A moving average is the average price a security over a set amount of time. By plotting a securities average price, the price movement is smoothed out. Traders are better able to identify the true trend and increase the probability that it will work in their favor. Researcher has calculated three months moving average.

5. **Deviation of Actual Price from Moving Average:** After calculating the moving average deviation of actual price from moving average is calculated using following equation.

$$= \frac{\text{Monthly average price}}{\text{Three months moving average price}} * 100 - 100$$

**Objectives of the Study Region**

The main objectives of this research work are cited as below-

1) To study monthly and seasonal arrival of Yellow Gram commodity in APMC Taloda tribal region.
2) To find out the decreasing trends in prices due to excess supply of Yellow Gram in the APMC Taloda.
3) To identify the merchants those have exploited the farmers.
4) To suggest the planning to protect the tribal farmers and APMCs.

**Explaination: Fluctuations in the Prices of Yellow Gram**

Fluctuations in the prices of yellow gram are displayed in the Table No.1 and Chart No.1 In the month of October about 5126.34 quintals (39.39%) yellow gram is arrived in APMC. Merchants have purchased yellow gram by paying Rs 1927 per quintal only. During this year in the month of February maximum price was Rs 3042 per quintal, when only 419.65 (3.22%) quintals of yellow gram are arrived in the APMC.



CamScanner

Farmers those have sent their yellow gram after the harvesting period immediately, they e in loss of Rs 1115 per quintal. This is real exploitation of poor tribal farmers. Board of PMC and government authorities should take

| Table No. 1: Arrival of **Yellow Gram** and Price Relation in Taloda APMC- 2010-11 | | | |
|---|---|---|---|
| Month | Total Weight | % of Weight | Average Rate Rs per Q |
| April | 1841.04 | 14.15 | 2494 |
| May | 2103.00 | 16.16 | 2548 |
| June | 458.14 | 3.52 | 2670 |
| **October** | **5126.34** | **39.39** | **1927** |
| November | 872.01 | 6.70 | 2034 |
| December | 603.27 | 4.64 | 2163 |
| January | 216.17 | 1.66 | 2260 |
| February | 419.65 | 3.22 | 3042 |
| March | 1375.07 | 10.57 | 2840 |
| **Total** | **13014.69** | **100.00** | |





**Table No.2 is showing Fluctuations in Monthly Average Price of Yellow Gram in the APMC Taloda-2010-11**

| Table No. 2: Fluctuations in Monthly Average Price of **Yellow Gram** in the APMC Taloda-2010-11 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Month | % Weight of Yellow Gram Arrived in the Market | Monthly Average Price of Yellow Gram (Per Q) | Change in Price from Previous Month (%) | Three Months Moving Average of Price (Rs) | Deviation of Actual Price from Moving Average (%) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| April | 14.15 | 2494.44 | | | |
| May | 16.16 | 2548.08 | 2.15 | 2570.80 | -0.88 |



CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| June | 3.52 | 2669.88 | 4.78 | 2381.63 | 12.10 |
| October | 39.39 | 1926.95 | -27.83 | 2210.12 | -12.81 |
| November | 6.70 | 2033.54 | 5.53 | 2041.03 | -0.37 |
| December | 4.64 | 2162.61 | 6.35 | 2152.15 | 0.49 |
| January | 1.66 | 2260.30 | 4.52 | 2488.34 | -9.16 |
| February | 3.22 | 3042.13 | 34.59 | 2714.04 | 12.09 |
| March | 10.57 | 2839.70 | -6.65 | | |

Source: Researcher has calculated with the help of dataset obtained from APMC Taloda,

**Change in Price of yellow gram from Previous Month (%)**

To calculate change in price from previous month following table is prepared. This Table No 2 reveals that Maximum change in the prices of yellow gram is calculated as + 34.59% in the month of February and minimum change in prices is found -27.83% in the month of October. Farmers have stored the yellow gram during harvesting period and sold it in the month of October to get maximum prices. October is the period of yellow gram cultivation. Generally prices of yellow gram are high during the cultivation period. In this judgment, farmers have sent yellow gram in the market, but unfortunately they got loss of Rs 1115.18 per quintal. Thus the figures of change in prices indicate acute variation in the prices of yellow gram. Chart No 2 is displaying graphical relationship between monthly average weight and change in prices of yellow gram.

**Three Months Moving Average of Yellow gram Prices**

Column No 5 is showing moving average prices of yellow gram. Figures of moving average are clearly showing acute variations in the prices. Lowest moving average price in the series is Rs 2041.03 per quintal, while highest moving average price is Rs 2714.04 per quintal. To find out difference in the actual price and moving average price, % deviation is calculated.

**Deviation of Actual Price from Moving Average (%)**

Column No 6 of Table No 2 is showing acute variations in the deviation between actual price and moving average price. These figures are ranging between +12.10% to -12.81%. The total difference between high and low prices is found 24.91% per quintal. Maximum positive difference is found in the month of June, December and February, while negative difference is found in the month October, January, November and May. Thus negative and positive high difference of deviation is showing loss of poor farmers, displaying monopoly of the merchants in the own jurisdiction (APMC) of farmers. If government, planners pay their necessary action against this exploitation to protect the poor farmers.



CS CamScanner

Chart No 3 is showing fluctuated trend of deviation of actual price from moving average. This graph reveals that there is acute deviation in every months, in the month of June (+ 12%), while in the month of October -12% deviations is discernable.




Chart No. 2: Fluctuations in Monthly Average Price of Yellow Gram in the APMC Taloda-2010-11





Chart No. 3.Deviation of Actual Price from Moving Average (%)

**Range of fluctuation:** Table No 3 is showing acute variations in range of fluctuation in prices of Yellow Gram. Range of fluctuation is ranging between 0 to 1115.18 Rs per quintal. Highest range of fluctuation is found in the month of October and November, figures of range of fluctuation reveals that there is high fluctuation in the prices of Yellow Gram Taloda APMC.

Table No.3. Extent of Fluctuation in Monthly Prices of **Yellow Gram** in APMC Taloda - 2010-11

| Month | Total Weight (Q) | Average Price Per (Q) | Range of Fluctuation | CV (%) |
|---|---|---|---|---|
| April | 1841.04 | 2494.44 | 547.69 | 13.62 |
| May | 2103.00 | 2548.08 | 494.06 | 13.66 |
| June | 458.14 | 2669.88 | 372.26 | 12.55 |
| October | 5126.34 | 1926.95 | 1115.18 | 5.74 |
| November | 872.01 | 2033.54 | 1008.59 | 8.76 |
| December | 603.27 | 2162.61 | 879.53 | 20.63 |
| January | 216.17 | 2260.30 | 781.84 | 15.69 |
| February | 419.65 | 3042.13 | 0.00 | 32.33 |
| March | 1375.07 | 2839.70 | 202.43 | 28.23 |

**Coefficient of Variation (Cv):** Month to month Cv index of Yellow Gram prices is found variable, ranging between 5.74% to 32.33%. Trend of Cv indices clear that per quintal yellow gram prices are varying from month to month and season to season.




Graph No 4 is showing the extent of fluctuation in the prices of yellow gram in Taloda APMC. This graph is also clearly presenting negative relation between variations of fluctuation and Cv.

## Conclusion

The study of supply and price trends clears that when the farmers produce the commodities and send it in the market they get low prices. When more than 40% farmers sold out of their total produce in the market, prices hiked up. If government, planners pay their attention to control the price variations, obviously farmers will get relief.

During the study period October about 5126.34 quintals (39.39%) yellow gram is arrived in APMC. Merchants have purchased yellow gram by paying Rs 1927 per quintal only. During this year in the month of February maximum price was Rs 3042 per quintal, when only 419.65 (3.22%) quintals of yellow gram are arrived in the APMC.

## References

1. Pawar C.T. and Lokhande T.N : Indian Journal of Regional Science Vol.XXXVI, No.1, 2004, (P.P.103-104)
2. Achraya S.S. (1988) : "Agricultural Production, Marketing and price Policy" Mittal Publication, New Delhi.
3. Agarwal N.L. (1988) : "Agricultural Prices and Marketing in India" Mittal Publication, New Delhi.
4. R.S.Dixit (1988): "Spatial Organization of Market Centers" Pointer Publishers, Jaipur.
5. H.M.Saxena (2004) : "Marketing Geography" Rawat Publications, Jaipur and New Delhi.



CamScanner

6. S.S.Acharya and M.L. Agarwal (2006) : "Agricultural Marketing in India" Oxford and IBH Publishing Co. Pvt. Ltd, New Delhi.

7. Talukder R. K., Maniruzzaman A. F. M. & Sarker K. S: Strengthening of Early Warning and Food Information System Project Ministry of Food, Dhaka, October, 2000.

8. Dr. Rezaul Kariam Talukder, Dr. A. F. M. Maniruzzaman, Kiran Sankar Sarker: "Analysis of prices and price Trends of Food grains in Bangladesh Strengthening of early warning and food information system project ministry of Food, Dhaka.October, 2000.

9. Herve Abdi: Program in Chognition and Neurosciences. MS: Gr.4.1, the University of Texas at Dallas, Richardson, TX 75083-0688, USA

10. http://www.investopedia.com/university/technical/techanalysis9.asp